जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५६ दिनांक - २२/०१/२०२४**

चतुःश्रृंगी पोलीस ठाणे पुणे शहर

## खुन करुन १३ वर्ष फरार असलेल्या आरोपीतास राजस्थान येथुन केले जेरबंद

दि.१५/०३/२०११ रोजी सुपरवायझर बाबुराव मोघेकर हे अंबिका सोसायटी,प्लॉट नं २०,सेनापती बापट रोड,पुणे येथे कन्स्ट्रक्शन साईटवरील वॉचमन नामे १.राजा ऊर्फ रज्जवा रामकेश यादव २.बिट्टी ऊर्फ शामबाबु छोटेलाल यादव यांना चेक करण्यासाठी गेले असताना,त्यांचा वॉचमन यांना राग येवुन त्यांच्यात वादावादी झाल्याने सदर दोन्ही वॉचमन यांनी बाबुराव विठ्ठल मोघेकर यांना अंबिका सोसायटी मधील लिफ्ट मध्ये तोंडात कापडी बोंळा कोंबुन व त्यांचे दोन्ही हात रस्सीने व दोन्ही पाय रस्सी व सॉक्सने बांधुन त्यांचा खुन करुन पसार झाले होते.

सदर गुन्ह्यातील फरार आरोपी श्याम बाबु यादव हा स्वतःचे अस्तित्व लपवुन नाव बदलुन विविध राज्यांमध्ये वावरत होता. याबाबत माहिती प्राप्त झाल्याने सदर आरोपीचे अस्तित्व तांत्रिक विश्लेषनाद्वारे निष्पन्न करुन तो राजस्थान राज्यातील झालावाड जिल्ह्यात नाव बदलुन राहत असल्याची खात्रीशीर माहीती प्राप्त झाली होती. त्यानुसार चुतःश्रृंगी पोलीस स्टेशनचे पोलीस पथक पिडावा,जि. झालावाड,राज्य राजस्थान या ठिकाणी जाऊन फरार आरोपीपैकी **बिट्टी ऊर्फ शामबाबु छोटेलाल यादव,वय-३३,रा.मुं.पो.हरा.पो.पहाडी,ता.करवी,जि.चित्रकोट,उत्तर प्रदेश** याचा शोध घेतला असता,तो त्याठिकाणी राधेश्याम या नावाने राहत असल्याचे समजले होते. सदर आरोपीस सापळा रचुन शिताफीने ताब्यात घेऊन,तोच बिट्टी ऊर्फ शामबाबु असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला अटक करुन झालावाड येथील मा.न्यायालयात हजर करुन ट्रान्झीट रिमांड प्राप्त करुन,आरोपीसह पोलीस पथक पुण्यात हजर झाले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त,श्री.विजयकुमार मगर, सहा.पोलीस आयुक्त,श्रीमती.आरती बनसोडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बालाजी पांढरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्री.अंकुश चिंतामण, पोलीस उपनिरीक्षक, अंगत नेमाने, पोलीस अंमलदार,सचिन कांबळे, सुहास पोतदार, सुधाकर माने, अस्लम अत्तार, गोकुळ घुले यांचे पथकाने केली आहे.


पोलीस स्टेशन